# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 07/11/2019 (गुरूवार)
# (दुपार)

---

## विनयभंग

1) पो.स्टे. मौदा :– दि. 06/11/2019 चे 16:00 वा. चे सुमारास 24 वर्षीय पीडित/फिर्यादी ही घरी झोपली असता आरोपी नामे– विकास शेंडे, रा. झुल्लर, ता. मौदा याने घराचा टेकलेला दार ढकलुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 452, 324, 323 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा जंगवाड 7083151993 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– सन 2017 ते आज पावतो 20 वर्षीय पीडित/फिर्यादी हीला आरोपी नामे– भौसागर भैसारे, रा. मोठी दिगोरी, जि. भंडारा याने पीडितेच्या मोबाईलवर फ्रेन्ड रीक्वेस्ट पाठवुन तिचा एका मित्र सोबत अफेयर रीलेशन आहे असे नातेवाईक यांचे मोबाईलवर बदनामीकारक मॅसेजेस पाठविले. त्यानंतर फिर्यादीचे बनावट फेसबुक अकाऊंट तयार करून त्यावर फिर्यादीचे फोटो पाठवुन तसेच बदनामीकारक मॅसेजेस पाठवुन फिर्यादीला लज्जा होईल व तीची बदनामी होइल असे कृत्य करून धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 354(ब), 400, 506 भादंवि. सहकलम 66(सी) माहिती व तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. कोळी 9657811111 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कन्हान :– मृतक नामे– झिबलजी सिताराम टेकाम, वय 58 वर्ष हा कोनाला काही न सांगता घरून निघून गेला. त्याचे हरविले बाबद पो.स्टे यशोधरानगर नागपुर शहर येथे दि 05/11/19 रोजी माहिती दिली होती. अंतर्गत 05 कि. मी. अंतरावर खंडाळा शिवार कन्हान येथे दिनांक 04/11/2019 चे 12.00 वा. दरम्यान मृतक याचे प्रेत पाण्यात पडल्यानंतर मृत अवस्थेत आढळून आले. सबंधीत कागदपत्रे प्राप्त झाल्यावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुरेश झिबलजी टेकाम, वय 47 वर्ष, रा. वांजरा मांजरी भिलगाव रोड वार्ड क्र. 4, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सुरू आहे.

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 07 कि. मी. अंतरावर मौजा पुसागोंदी शिवार येथे दिनांक 09/10/2019 चे 17.00 वा. दरम्यान गजानन कनीलाल चव्हाण, वय 32 वर्ष, रा. पुसागोंदी हा पंख्याची पिन इलेक्ट्रीक बोर्डला लावत असतांना त्याला करंट लागला. त्यास उपचाराकामी प्रथम पीएचसी कोंढाळी व नंतर मेडीकल कॉलेज, नागपूर येथे नेले असता दि 09/10/19 चे 21.30 वा. डॉक्टरांनी गजानन चव्हाण यास तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी सर तर्फे प्रमोद वाळके यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर